MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १९ अंक : ३ पाने : ८ एप्रिल-मे २०२४ www.mahatransco.in Follow us on :

## प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,

२०२४-२०२५ या नव्या आर्थिक वर्षात अधिक क्षमतेने आपण ठरविलेल्या लक्ष्यांना (Targets) प्राप्त करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न कराल, याची मला खात्री आहे. कंपनीतील प्रत्येक विभागाकरिता ठरवून दिलेली लक्ष्ये (Targets) गाठण्यात आपल्याला यश येईल, याबद्दल मी आशा बाळगतो. विविध धोरणात्मक निर्णय घेऊन आपण आपल्या कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्याला भविष्यात चांगले यश मिळेल, याची मला खात्री आहे. यामध्ये सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपले मोलाचे योगदान देऊन सहकार्य केले आहे, हे विसरून चालणार नाही.

विकासाचा वेग पकडताना आपण आपली

- कामांचा नियमित आढावा घ्या
- कामांचे योग्य नियोजन करा
- विविध अडचणींवर मात करा
- सांघिक भावना कायम ठेवा

कार्यक्षमता वाढवून कामाची अधिक गुणवत्ता व वेग वाढविणे गरजेचा आहे. स्पर्धात्मक युगातही आपल्या आघाडीचा स्तर कायम ठेवण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. यासाठी ऊर्जा क्षेत्रात नवे काय बदल होत आहेत, याची आपण चिकित्सा करून त्यादृष्टीने नवे सकारात्मक बदल आपल्यात व कंपनीमध्ये केले पाहिजेत. सध्या देशपातळीवर ऊर्जा क्षेत्रात खूप मोठे बदल होत आहे, त्याबाबत आपण सजग असले पाहिजे. वीज पारेषण क्षेत्रात महाराष्ट्र राज्य नेहमीच अग्रेसर आहे. विविध योजना व तंत्रज्ञानाचा वापर अधिक सहजतेने करण्याचा आपला मानस असला पाहिजे. त्याप्रमाणेच महापारेषणने नेहमीच नवे तंत्रज्ञान व आधुनिक प्रणालीचा वापर केला आहे. त्या सर्व प्रयत्नांचा आपल्या कंपनीच्या प्रगतीमध्ये मोलाचा वाटा आहे.

कंपनीची प्रगती करणे ही जशी व्यवस्थापनाची जबाबदारी आहे, तशीच ती प्रत्येक अधिकारी, अभियंता व कर्मचाऱ्यांची देखील आहे. सर्व कर्मचारी हे संघटनात्मक स्तरावर आपले संपूर्ण कौशल्य पणाला लावून या कंपनीच्या प्रगतीत मोलाचा हातभार लावू शकतात. कंपनीचे काम हे आपले काम आहे, असा प्राधान्यक्रम ठेवून आपली कार्यशैली बदलली पाहिजे. तंत्रज्ञानाचा उपयोग करून कंपनीला आपण सर्वोच्च ठिकाणी कसे ठेवू शकतो, याबाबत विचार केला पाहिजे. महापारेषणचे कर्मचारी हे त्यांच्या विशेष तांत्रिक ज्ञानाने व कुशलतेने परिपूर्ण आहेत. शैक्षणिक ज्ञान व सोबतीला कार्यात्मक ज्ञान असल्यामुळे कोणत्याही अडचणींवर मात करण्याची क्षमता आपल्याकडे आहे, याची मला जाणीव आहे. अनुभवी कर्मचारी मोठ्या कुशलतेने आपली यंत्रणा सांभाळण्याचे काम करत आहेत, याची मला खात्री आहे. नवख्या अभियंत्यांनाही विविध तंत्रज्ञानाची जोड देण्याबाबत आपण सुचित केले पाहिजे.

सध्या एप्रिल-मे महिना असल्यामुळे वातावरणात प्रचंड उकाडा आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान सुखकर करण्यासाठी आपल्याला सुरळीत व अखंड वीजपुरवठा करावा लागणार आहे. उन्हाळ्यात कुणालाही विजेचा प्रश्न भेडसावणार नाही, याबाबत आपण दक्ष राहिले पाहिजे. क्षेत्रीय कार्यालयांना कोणत्या प्रकारची मदत किंवा साधनसामुग्रीची गरज असेल तर ते समजून घेऊन त्यावर योग्य ती उपाययोजना या बैठकांतून करता येते. प्रत्येक वरिष्ठ कार्यालयाने त्यांच्याअंतर्गत असलेल्या कनिष्ठ कार्यालयांशी अशाच प्रकारच्या बैठकांच्या माध्यमातून समन्वय साधून कंपनीच्या एकंदरीत कार्यक्षमता वाढविण्यास हातभार लावला पाहिजे, असे मला वाटते.

सुयोग्य व्यवस्थापनाकरिता कोणतेही काम हे वेळ व कामाचे विभाजन या दोन घटकांत मोजणे गरजेचे ठरते. त्यासाठी विविध माध्यमांतून आढावा बैठक (Review Meeting) घेतली जाते. त्यासाठी कामाचे योग्य व्यवस्थापन हे परिमंडळ, मंडळ व उपमंडळ अशा विविध पातळींवर सुक्ष्मपणे होणे गरजेचे आहे. त्याकरिता आपल्या कर्मचाऱ्यांचा अनुभव व अंमलबजावणी क्षमतेचा चांगला उपयोग करून घेणे गरजेचे ठरते. सांघिक कार्यालय हे महापारेषणचा अतिमहत्त्वाचा भाग आहे. काम आणि कामांचे अनुकरण याबाबत कार्यालयाने उत्तम उदाहरण घालून दिले पाहिजे. हे कार्यालय मानकीकरण व सुस्पष्ट मार्गदर्शक तसेच कार्यासंदर्भातील नामांकने क्षेत्रीय कार्यालयाकरिता तयार करते. उत्पादकता व परिणाम, वेळेवर प्रस्तावांची मंजुरी यामध्ये प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची आहे.

देशाचे नियोजन हे प्रत्येक राज्याच्या नियोजनात्मक कामगिरीवर देखील अवलंबून असते. विविध प्रकल्पांची कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण



**डॉ. संजीव कुमार** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

करून आपण देशकार्यात हातभार लावत असतो. महापारेषणच्या विविध प्रकल्पांची कामे योग्यरित्या सुनियोजन करून पूर्ण करणे, हे आपले महत्त्वाचे कार्य आहे. महत्त्वाकांक्षी टप्पे गाठताना यंत्रणेचे मजबुतीकरण, सुव्यवस्था व अपघातशून्य कार्यक्षेत्र हे घटकसुध्दा तितकेच महत्त्वाचे असतात. कोणतीही जोखीम न घेता निर्देशित केलेल्या कार्यप्रणालीनुसार काम करणे गरजेचे असते.

आज वीजक्षेत्रामध्ये बऱ्याच आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. विविध आव्हाने लक्षात घेऊन त्यावर मात करण्यासाठी आपण सदैव तत्पर असले पाहिजे. आधुनिकीकरणाची गती वाढत असतानाच गुणवत्ता, कार्यतत्परता व कामाप्रती निष्ठा ठेऊन काम पूर्णत्वास नेणे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. सांघिक यशाकरिता सकारात्मकता, नवनवीन गोष्टी शिकण्याची आस व निरंतर सुधारणेसाठी प्रयत्न. या तिन्ही गोष्टी आपल्या कंपनीच्या यशस्वी वाटचालीसाठी गरजेच्या आहेत.

कामांचा नियमित आढावा, सूत्रबध्द नियोजन, विविध आव्हानांशी सामोरे जाण्याची तयारी व विविध अडचणींवर वेळेवर लक्ष देऊन संसाधनांचा योग्य समन्वय साधून त्या दिशेने काम करण्यासाठी सांघिक भावनेने सर्वांना प्रोत्साहित करावे, याकरिता मी सर्वांना मनापासून आवाहन करतो.

**शुभेच्छांसह..!**

**- डॉ. संजीव कुमार**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक





**परळी :** चक्रीवादळामुळे महापारेषणच्या गिरवली विभागाअंतर्गत येणाऱ्या अतिउच्चदाब वाहिनीचे सहा मनोरे नंदागौळ आणि अंबलवाडीच्या अतिदुर्गम डोंगरांमध्ये कोसळले. दुसऱ्या छायाचित्रात महापारेषण कंपनीचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नासिर कादरी तसेच परळी मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. मिलिंद बनसोडे यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून पुर्नउभारणीच्या कामाची नियोजनबध्द आखणी केली.

### ▶ महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे युध्दपातळीवर काम

# चक्रीवादळात कोसळलेल्या २२० के.व्ही. विद्युत मनोऱ्यांची केली विक्रमी वेळेत उभारणी!

Follow us on :

महाराष्ट्रातल्या काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात चक्रीवादळ झाले. या चक्रीवादळाचा तडाखा परळी व परिसरालाही बसला. या वादळामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या गिरवली विभागाअंतर्गत येणाऱ्या अतिउच्चदाब वाहिनीचे सहा मनोरे नंदागौळ आणि अंबलवाडीच्या अतिदुर्गम डोंगरांमध्ये कोसळले. या दुर्घटनेमुळे २२० के.व्ही. गिरवली परळी सर्किट– २ आणि २२० के.व्ही. परळी PGCIL (पॉवरग्रिड) सर्किट–२ या अशा दोन महत्त्वाच्या विद्युत वाहिन्या बंद पडल्यामुळे बीड व लातूर या जिल्ह्यांना होणाऱ्या विद्युत पुरवठ्याची परिस्थिती अत्यंत नाजूक बनली. दरम्यान, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन महापारेषण प्रशासनाकडून तातडीने उपाय योजनेसाठी पाऊले उचलण्यात आली.

महापारेषण कंपनीचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नासिर कादरी तसेच परळी मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. मिलिंद बनसोडे यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून पुर्नउभारणीच्या कामाची नियोजनबध्द आखणी केली. या कामासाठी लातूर, परळी व गिरवली येथील अभियंते व कर्मचाऱ्यांची संघबांधणी करून मनोरे उभारण्याचे काम युध्दपातळीवर सुरू केले. भौगोलिकदृष्ट्या अत्यंत दुर्गम असलेल्या डोंगरावर मनोरे पुर्नउभारणीचे काम करणे अतिशय जिकिरीचे होते. प्रत्यक्ष घटनास्थळी पोहोचण्यासाठी रस्ताच नसल्यामुळे मनोरा उभारणीसाठी लागणारे साहित्य व यंत्रसामुग्रीची वाहतूक करणे कठीण होते. या सर्व अडचणींवर मात करीत एकसंघपणे महापारेषणचे अभियंते व कर्मचारी यांनी मुख्य अभियंता श्री. नासिर कादरी व अधीक्षक अभियंता श्री. मिलिंद बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली अहोरात्र काम केले.



कडक उन्हात कुठल्याही प्रकारची सावली नसलेल्या निर्जन ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक तांत्रिक अडचणीवर मात करीत महापारेषणच्या परळी, लातूर, बीडमधील अधिकारी व कर्मचारी यांनी एकत्रितपणे अहोरात्र मेहनत घेऊन कोसळलेल्या सहा विद्युत मनोऱ्यांचे पायाभरणी, मनोरा उभारणी आणि दोन किलोमीटर तार ओढणीचे काम विक्रमी वेळेत पूर्ण केले. २२० के. व्ही. परळी PGCIL (पॉवरग्रिड) सर्किट-II ही विद्युत वाहिनी अवघ्या नऊ दिवसात पूर्ववत केली. या कामाकरिता नांदेड प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता सर्वश्री शशिकांत दिवाकर, लातूर प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक गडदे, ४०० के. व्ही. (संचलन व सुव्यवस्था) गिरवली विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल जोशी, अ.उ.दा (संवसु) बीड विभागाचे कार्यकारी अभियंता वासुदेव लबासे, अ.उ.दा (संवसु) लातूर विभागाचे कार्यकारी अभियंता प्रकाश जायभाय, मेजरस्टोअर धाराशिव कार्यकारी अभियंता संजीव चाटे तसेच अतिरिक्त कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत दगडगुंडे, संतोष चव्हाण, प्रशांत चव्हाण, सचिन चव्हाण, महेश नडगिरे, दिलीप फेरे, उपकार्यकारी अभियंता संदीपान नागरगोजे, नितीन मुंडे, ऋषिकेश नायगावकर, डी. बी. मारलापल्ले, सहाय्यक अभियंता राजेश तिडके तसेच परळी मंडळातील वेगवेगळ्या वाहिनी उपविभागातील लाईनस्टाफ सर्वश्री. अमजत संगतराज, कैलास आतमवाड, पंकज भागवत, शत्रुघ्न गाढवे, वैजनाथ फड, संजय पोखरकर, प्रशांत मसने, प्रवीण टाकळगावे, सिध्देश्वर गिते, धनंजय झिरमिळे, एस.डी. माळी, व्ही.एच. राठोड, ए.बी. सगर, आर.डी. बचाटे, ए.व्ही. होळकर, जी.बी.माळी, एस. एस. सुकेवार, जी.बी. गवारे, एन.बी. कसपटे, के.ए. गुरव यांनी दिवस-रात्र मनोऱ्याची पायाभरणी व उभारणीकरिता देखरेख केली.

काम लवकर पूर्ण होण्यासाठी अभियंते व कर्मचारी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी तळ ठोकून होते. अशा निर्जन व दुर्गम भागात कुठल्याही प्रकारची व्यवस्था नसल्यामुळे काम लवकर होण्याच्या दृष्टिकोनातून महापारेषणने कामावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पाणी व जेवणाची व्यवस्था प्रत्यक्ष घटनास्थळावरच केली होती. या कामी मे. सोमेश्वर विद्युत या एजन्सीचे संचालक श्री. चंद्रकांत गिते, पर्यवेक्षक रामेश्वर आपेट व त्यांच्या चमूने दिवस-रात्र काम केले तसेच मनुष्यबळ वाढवण्याकरिता नांदेड व परतुर येथून मे. सुजाता इलेक्ट्रिकल्स व मे. निळशिखा यांच्या टीम मागविण्यात आल्या. या मनोराच्या पुर्नउभारणी कार्यामुळे सदर वाहिनीव्दारे होणारा विद्युतपुरवठा पूर्ववत झाला. महापारेषण कंपनीच्या तांत्रिक टीमचे आणि अभियंत्यांचे कार्य कौतुकास्पद ठरले असून त्यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे अनेकांना दिलासा मिळाला आहे.


@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in

**सांघिक कामाचे यश**

▶ अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वरिष्ठांनी केले कौतुक

# ४०० के. व्ही. कळवा उपकेंद्रात मेन बसवरील स्टब बसविण्याचे काम पूर्ण

Follow us on :



४०० के. व्ही. कळवा-पडघा वाहिनी क्रमांक १ च्या ४०० के. व्ही. कळवा उपकेंद्रात मेन बसवरील स्टब बस बदलण्याचे महत्त्वपूर्ण व जोखमीचे काम यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले.

४०० के.व्ही. कळवा-पडघा वाहिनी क्रमांक-१ चे HTLS कंडक्टरचे काम अंतिम टप्प्यात आल्यानंतर लाईनचे स्टब बस बदलण्याचे काम पूर्ण करणे आवश्यक होते. परंतु, हे काम प्रचलित पध्दतीनुसार करणे अशक्य होते. त्यामुळे हॉटलाईन पध्दतीने पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले.


४०० के. व्ही. कळवा उपकेंद्र हे मुंबईशी संलग्नित व पूर्णपणे लोडेड उपकेंद्र असल्यामुळे ४०० के. व्ही. मेन बस A आणि B चे आऊटेज सदर कामासाठी मिळणे अशक्य होते. त्यामुळे सदर काम हॉटलाईन पध्दतीने करण्याचा निर्णय घेण्यात आला. यात चालू बसवरून सध्याच्या स्टब बसवर रोलर पाठवून नवीन HTLS कंडक्टर ओढण्यात आला. यात सर्वप्रथम रोलर पाठविण्यासाठी हॉटसुट घालून हॉटमॅनला जुन्या Stab Bus वरून चालत पाठविण्यात आले. या वेळी स्टब बसचा Sag वाढून तो खालील Live मेन बसच्या इंडक्शन झोनमध्ये येऊन Bus Fault होणार नाही, याची काळजी घेण्यात आली.

सदर कामामध्ये रोलर पास करणे, जुने स्पेसर काढणे, नवीन HTLS कंडक्टर जुन्या कंडक्टरवरून ओढणे, नवीन स्पेसर लावणे, स्टब बसच्या दोन्ही बाजूचे इन्सुलेटर बदली करणे इ. कामांचा समावेश होता. सदर काम मे. अपार इंडस्ट्रीज यांचेकडून कुशल मनुष्यबळाचा वापर करून पूर्ण करण्यात आले.

सदर काम यशस्वी करण्यासाठी वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके व अउदा संवसु, कळवा येथील अधीक्षक अभियंता श्री. विजय आवारे यांचे मार्गदर्शन लाभले. सदर कामाची WRLDC कडून परवानगी मिळण्यासाठी राज्य भार प्रेषण केंद्राचे मुख्य अभियंता श्री. महेश भागवत, अधीक्षक अभियंता (संचलन) श्री. गिरीश पंतोजी यांचे सहकार्य लाभले.

सदर काम यशस्वी करण्यासाठी ४०० के. व्ही. ग्रहण केंद्र विभाग, कळवा येथील कार्यकारी अभियंता श्री. पंकज शेलार, श्री. संतोष भुजबळ, श्री. मुकुंद पवार यांच्या सहकार्याने अतिरिक्त कार्यकारी अभियंता, देखभाल विभाग, कळवा येथील श्री. सतीश शुक्ला व त्यांच्या टीमने प्रयत्न केले.





**कळवा :** ४०० के. व्ही. कळवा-पडघा वाहिनी क्रमांक-१ च्या उपकेंद्रात मेन बसवरील स्टब बस बदलण्याचे महत्त्वपूर्ण व जोखमीचे काम कर्मचाऱ्यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले.


आमच्याशी कनेक्टेड रहा

@maha_transco @maha_transco MahaTransco

MahaTransco Mahatranscoltd MahaTransco



## जयंती विशेष...

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे


**डॉ. बाबासाहेब आंबेडकर** काही इंजिनिअर नव्हते. त्यातले तंत्रज्ञान त्यांच्यापाशी नव्हते, पण जल आणि ऊर्जा विषयाचा सखोल अभ्यास मात्र त्यांच्या ठायी जाणवतो. हीच त्यांची नियोजन प्रक्रिया. जेव्हा एकूणच बहुआयामी महामानवाच्या जगण्याचा सूक्ष्म अभ्यास आपण करतो तेव्हा जल, वीज, पर्यावरण आणि त्याचा विकास यासंदर्भातली या महापुरुषाची भूमिका व नियोजन काय होते याकडे लक्ष जाते आणि त्यांच्या योजनांचा आपल्या महाराष्ट्रात अभ्यास व्हायला हवा, हेही कळायला लागते.

**1942**-46 यादरम्यान ब्रिटिश काळात 'व्हाइसरॉय' मंत्रिमंडळात असताना 'श्रम खाते' त्यांच्याकडे होते. 'हिराकूड', 'दामोदर', 'सोन' नद्यांवरील धरणांची सुरुवात याच काळात झाली होती. डॉ. आंबेडकरांकडे श्रम, जलसिंचन आणि ऊर्जा खाते होते. म्हणूनच त्यांना नियोजनाचे पायाभरणी करणारे अभ्यासू म्हणता येईल. पर्यावरण, जलसिंचन, वीज योजना याविषयी डॉ. बाबासाहेबांनी संकल्पना मांडली, कारण भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकरी सुखी झाला पाहिजे, ही त्यांची धारणा होती. 1942-46 यादरम्यान धरण, प्रकल्प इत्यादींविषयी धोरणे तयार करण्यासाठी त्यांनी महत्त्वाची जबाबदारी स्वीकारली. मल्टिपर्पज व्हॅली प्रोजेक्ट (नदी खोरे प्रकल्प) हीच ती नेमकी योजना.

डॉ. बाबासाहेबांच्या मते (1) अपुऱ्या भांडवलामुळे शेतीची कमी उत्पादकता होते. (2) शेतीमधील दरडोई उत्पन्न कमी करण्याचे मुख्य कारण लोकसंख्येचा पडणारा प्रचंड भार. (3) शेतीचे दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करणे. (4) औद्योगिकीकरणामुळे शेतीच्या विकासाची नेमकी गुरुकिल्ली आहे. (5) औद्योगिकीकरणामुळे लोकसंख्येचा भारसुद्धा कमी होतो. ही वैचारिक मते त्यांनी 1918 मध्ये मांडली आणि यावर 1942-46 दरम्यान नियोजन केले. नव्या जल आणि विद्युत धोरणाची पायाभरणी केली. 1945 मध्ये केंद्रीय जल आयोग स्थापन झाले. डॉ. ए. एन. खोसला या आयोगाचे अध्यक्ष होते. त्यानंतर डॉ. खोसला ओरिसाचे गव्हर्नर झाले. 'हिराकूड' धरणाची पायाभरणी 15 मार्च 1946 रोजी झाली. याच काळात डॉ. बाबासाहेब मंत्रिमंडळात नव्हते. ओरिसा असेंब्लीने 'हिराकूड' धरणाचे विधेयक 28 ऑगस्ट 1947 रोजी मंजूर केले. डॉ. खोसला यांच्या अध्यक्षतेखालील या समारंभास पं. जवाहरलाल नेहरू हजर होते. डॉ. खोसला आपल्या भाषणात म्हणाले, 'हा हिराकूड प्रकल्प सुरू करण्यात डॉ. आंबेडकरांचा मोठा वाटा व सहभाग आहे.' या समारंभात पं. नेहरू म्हणाले, 'धरणे भारताची आधुनिक मंदिरे आहेत.'

1942-47 मध्ये कॅबिनेट मेंबर म्हणून डॉ. बाबासाहेबांवर श्रम, जलसिंचन आणि ऊर्जा खात्याची जबाबदारी सोपवण्यात आली. या योगदानाकडे आपल्या मराठी वाचकांचे अथवा तज्ज्ञांचे लक्ष गेले नाही. याची काय कारणे असतील, हे मात्र सांगता येत नाही. जल


@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in



# जल व ऊर्जा नियोजन

आणि ऊर्जा समस्या देशाला आता सतावत आहे. यावर आपल्या तज्ज्ञांनी डॉ. बाबासाहेबांच्या धोरणांचा अभ्यास करण्याची हीच वेळ आहे. 3 एप्रिल 1944 रोजी डॉ. बाबासाहेबांनी कोलकाता येथील परिषदेत स्पष्ट केले.

***1) दामोदर प्रकल्पाचा हेतू केवळ महापूर थांबवणे एवढाच नसून त्यामध्ये विद्युतशक्तीची निर्मिती, सिंचन योजना, पाण्याचा पुरवठा, जलवाहतूक आणि औद्योगिक वापरासाठी पाणी याचा समावेश होतो.***

***2) कूपनलिकेच्या साहाय्याने उपसा करून सिंचन उपयोगिता वाढवण्याचा आणि त्या ठिकाणी उत्पादनक्षमता वाढवण्याचा समावेश होतो. (डॉ. बाबासाहेबांनी त्यासंदर्भात बरीच चर्चा केली. मात्र, इथे दोन गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला आहे.)***

या एकूण प्रकल्पांवर डॉ. बाबासाहेबांनी पाच अधिवेशनात व्याख्याने दिली आहेत. देशातील जलसंपत्ती विकासाच्या मुद्द्यावर त्यांचा भर होता, हे मला नमूद करावेसे वाटते. जलमार्गांविषयी आलेल्या समस्यांचा अभ्यास करणे, त्या सोडवण्यासाठी कार्यक्षम तज्ज्ञ मंडळी, त्यातली जाणकार नोकर मंडळी इत्यादींचा समावेश व्हावा म्हणून डॉ. बाबासाहेबांनी 4 एप्रिल 1947 रोजी 'जल आयोगाची' स्थापना केली. बंगालच्या टेकड्यांमधून उगम पावलेली दामोदर नदी ओरिसातून बिहारकडे वेगाने येते आणि कोलकात्यापासून खाली हुगळी नदीला जाऊन मिळते. तेव्हा व्हायचे असे, या एकूण 540 किलोमीटर लांबीच्या प्रवासात बिहारात पूर यायचा. हे जेव्हा डॉ. बाबासाहेबांना दिसले, तेव्हा ओरिसाचे काँग्रेस नेते डॉ. हरेकृष्ण मेहताब यांनी डॉ. बाबासाहेबांना पत्र लिहिले. त्यातला मजकूर असा, 'तिचा पुरता बंदोबस्त करा.'

दामोदर खोऱ्याची योजना जेव्हा डॉ. बाबासाहेबांनी आखली, तेव्हा देशभक्तीचा आणि जनकल्याणाचा उत्तम नमुना डॉ. बाबासाहेबांच्या ठायी दिसतो. हा प्रकल्प अमेरिकेतील 'टेनिसी व्हॅली ॲथॉरिटी' प्रकल्पावर आधारित योजना आहे. महापुरामुळे मानवी जीवन रसातळाला जाते. हाच नेमका विध्वंस रोखून मानवी हित कसे करता येईल, याविषयीचे या थोर महामानवाचे विचार जाणून घेता येतील. नदीच्या पात्रात सुरुंग लावणे, नदीचे पात्र मोठे करणे, नदीचे पात्र खोल करणे, म्हणजे पुराचे पाणी नदीत सामावून जाईल. पुराच्या पाण्याचा साठा करून हरित क्रांती कशी करता येईल? हे विचार आजच्या युगात किती उपयोगी आहेत हे सिद्ध होते. डॉ. बाबासाहेबांचे योगदान लक्षात घेऊन सी. एच. भाभा यांनी 1946 मध्ये जेव्हा डॉ. बाबासाहेबांकडून पदाचा स्वीकार केला, तेव्हा त्यांचे खालील उद्गार (मोजकेच सांगतो आहे) आहेत, 'आपण अत्याधुनिक अशा जल विकास संकल्पनेकडून वळलो आहोत. महानदी, कोसी, सोन नदी प्रकल्प तयार झाला. प्रादेशिक विकासाचे प्रकल्प ज्यांनी तयार केले त्यांचे आम्ही ऋणी आहोत.'

प्रोफेसर एच. सी. हर्ट यांनी आपल्या 'न्यूज इंडियाज रिव्हर्स' या पुस्तकात डॉ.आंबेडकरांच्या योगदानाविषयी दामोदर धरणासंबंधात उद्गार काढले, 'खोऱ्यात पावसाचे पाणी किती उपलब्ध होईल, त्याचे नियंत्रण कसे करावे, इत्यादी प्रश्नांची सोडवणूक इंजिनिअर मंडळी करू शकली, परंतु कठीण प्रश्न मुख्यत: राजकीय स्वरूपाचे होते. रहिवाशांची इच्छा, प्रांतीय सरकारे बिहार व बंगाल यांची बहुउद्देशीय दामोदर खोरे विकासाबाबतीत मान्यता, तसेच खर्चाचे विवरण इत्यादी हे राजकीय स्वरूपाचे होते.' शेवटी याचप्रसंगी प्रा. हर्ट म्हणतात, 'दामोदर खोरे विकासाच्या बाबतीत राजकीय निर्णय घेतला ती व्यक्ती डॉ. आंबेडकर. खऱ्या अर्थाने जल व ऊर्जा नियोजन याची पायाभरणी करण्याचे श्रेय डॉ. आंबेडकरांना जाते.'

**(संदर्भ ग्रंथ- बाबासाहेब आंबेडकर : नियोजन, जल व विद्युत विकास-भूमिका व योगदान - ले. सुखदेव थोरात)**

अभिवादन महामानवाला

महापारेषणच्या कार्यालयात विविध कार्यक्रम

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

सुरूवातीला महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. याप्रसंगी संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता (प्रकल्प) श्री. सुनील सूर्यवंशी, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, अधीक्षक अभियंता श्री. एकनाथ ढेंगळे, श्री. सचिन खडगी, कार्यकारी अभियंता श्री. गजानन कोल्हे, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, व्यवस्थापक तथा संचालक (मा.सं.) यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. महेश आंबेकर, श्री. सुशील घाडगे उपस्थित होते.



**मुंबई :** महापारेषण कंपनीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना संचालक (संचलन) सर्वश्री सतीश चव्हाण. याप्रसंगी संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे, मुख्य अभियंता सुनील सूर्यवंशी, भूषण बल्लाळ, अधीक्षक अभियंता एकनाथ ढेंगळे, सचिन खडगी, गजानन कोल्हे, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव व अन्य अधिकारी.

याप्रसंगी मान्यवरांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मौलिक विचार सांगितले. महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार यांच्याविषयीची माहिती सांगितली. तसेच महाराष्ट्रातील महापारेषणच्या विविध कार्यालयात संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. काही अधिकाऱ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकांचे वाचन केले. तर काही कर्मचाऱ्यांनी भीमगीते गाऊन अनोख्या पध्दतीने जयंती साजरी करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री. सुशील घाडगे यांनी मानले.

जय बसव

अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती

# महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी







**मुंबई :** महापारेषणमध्ये महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सर्वश्री डॉ. संजीव कुमार, संचालक (प्रकल्प) अविनाश निंबाळकर, संचालक (संचलन) सतीश चव्हाण, मुख्य अभियंता सुनील सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता किशोर गरूड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील व अन्य अधिकारी.

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

सुरूवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. यावेळी संचालक (संचलन) सर्वश्री सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) अविनाश निंबाळकर, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) मंगेश शिंदे, मुख्य अभियंता पीयूष शर्मा, सुनील सूर्यवंशी, भूषण बल्लाळ, रंगनाथ चव्हाण, श्रीमती जुईली वाघ, श्रीमती ज्योती चिमटे, अधीक्षक अभियंता किशोर गरूड, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) राजू गायकवाड, उपमहाव्यवस्थापक (मनुष्यबळ नियोजन) नितीन कांबळे, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुलकर्णी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी संत बसवेश्वर यांच्या कार्याबद्दल उपस्थितांना माहिती सांगितली. कार्यक्रमास विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मुंबई : महापारेषणमध्ये ६४ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

### अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती

# महाराष्ट्र दिन व कामगार दिन महापारेषणमध्ये उत्साहात साजरा

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत ६४ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. मंगेश शिंदे, मुख्य अभियंता श्री. संदीप कलंत्री, श्रीमती जुईली वाघ, श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. भूषण बल्लाळ, श्री. पीयूष शर्मा, श्री. रंगनाथ चव्हाण, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुलकर्णी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. अभय रोही, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, कार्यकारी अभियंता श्रीकांत पेटकर, श्री. पारस सवाई यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




मुंबई : महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या कार्यक्रमानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एकत्रित छायाचित्र काढले.

**एकीचे बळ** ▶ महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सांघिक प्रयत्न

# २२० के. व्ही. एकलहरेमधील रोहित्र अवघ्या दोन दिवसात कार्यान्वित

Follow us on :

२२० के. व्ही. ओसीआर एकलहरे उपकेंद्र, नाशिक येथे ५० एम.व्ही.ए. क्षमतेचे दोन रोहित्र नादुरूस्त झाल्यामुळे नाशिक शहरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. दरम्यान, महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अवघ्या दोन दिवसात रोहित्र कार्यान्वित करून वीजपुरवठा सुरळीत केला.

महावितरणच्या काही ३३ के. व्ही. वाहिन्यांची वीजवहन क्षमता कमी असल्यामुळे सुरळीत वीजपुरवठा करण्यामध्ये अडचणी येत होत्या. त्यामुळे चक्राकार पध्दतीने भारनियमन करून वीजपुरवठा सुरु ठेवण्यात आला. दरम्यान, महापारेषणच्या अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांनी युध्दपातळीवर काम करत दोन रोहित्रांपैकी ५० एम. व्ही. ए. क्षमतेचा एक रोहित्र दोन दिवसात तर दुसरा रोहित्र पुढील दोन दिवसांत कार्यान्वित केला.

यावेळी महापारेषण कंपनीचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण व राज्य भार प्रेषण केंद्राचे कार्यकारी संचालक श्री. शशांक जेवळीकर यांनी प्रत्यक्ष हजर राहून अधिकारी व कर्मचाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे कठीण वाटणारे काम वेळेत पूर्ण होऊ शकले. तसेच महावितरणच्या नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. दीपक कुमठेकर, अधीक्षक अभियंता श्री. पडळकर यांनीही वेळेवर मार्गदर्शन करून वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले. या कामात मे. एस.पी. पॉवर्स, मे. फरहत ट्रान्सपोर्ट व अन्य एजन्सींचे सहकार्य मिळाले. वीजपुरवठा सुरळीत व अखंडित ठेवण्यासाठी नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे, अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण भालेराव, श्री. माणिक गुट्टे, श्री. अनिल भारसाकळे, श्री. प्रकाश लिमकर यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.



**एकलहरे :** २२० के. व्ही. ओसीआर एकलहरे उपकेंद्रात ५० एम.व्ही.ए. क्षमतेचे नादुरूस्त दोन रोहित्र महापारेषणच्या कर्मचाऱ्यांनी अवघ्या दोन दिवसात चालू करून वीजपुरवठा सुरळीत केला.



**नाशिक :** येथील परिमंडळाच्या वतीने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. संदीप कलंत्री, श्री. संजीव भोळे, अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण भालेराव, श्री. माणिक गुट्टे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. मिलिंद घोलप, वरिष्ठ व्यवस्थापक (विवले) श्रीमती पल्लवी बनकर.



**ऐरोली :** अउदा स्थापत्य बांधकाम-नि-सुव्यवस्था मंडल, ऐरोली येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. मोहन ननवरे यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अधिकारी व कर्मचारी वर्ग.


संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **Dr.Milind Awatade** PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,** Printed at **Jyotirling Enterprises :** 315-B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N.M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 23002574 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai - 400 051. The Company accepts no responsibility for the matter published in the journal.